**अतारांकित प्रश्नोत्तरांची पाचवी यादी**

# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (पावसाळी) अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**पंढरपूर (जि. सोलापूर) नगरपालिकेच्यावतीने उभारण्यात आलेल्या स्मशानभूमीबाबत**

**(१) ७०१७ (०६-०८-२०१५) श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि. सोलापूर) येथील गोपाळपूर रोड लगत नगरपालिकेच्यावतीने स्मशानभूमी बांधण्यात आली असून सदरील स्मशानभूमीतील मुतारी व शौचालयाची दुरवस्था झाली असून येथे चिल्लारीच्या झाडा-झुडपांनी दफनभूमी वेढली गेली असल्याचे दिनांक ६ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील स्मशानभूमीत पिण्याच्या पाण्याची सुविधा व विद्युत दिवे वाढविण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१७) :** (१) गोपाळपूर रोडवर नदीलगत नगरपरिषदेची हिंदू स्मशानभूमी आहे. सदर स्मशानभूमीत झाडा-झुडपाची वेळोवेळी जे.सी.बी. मशिनने काढणी करुन घेऊन परिसर स्वच्छ ठेवला आहे. स्मशानभूमी नजीकच्या मुताऱ्याच्या शौचालयाची अद्ययावत इमारत तिर्थक्षेत्र विकास आराखडयांतर्गत बांधून घेतली आहे.

(२) स्मशानभूमीमध्ये पुरेसे विद्युत दिवे असून त्याची देखभाल दुरुस्ती केली जाते. तसेच पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था नगरपरिषदेकडून करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात स्वतंत्र परिवहन कायदा करण्याबाबत

**(२) ८५१९ (३१-०७-२०१५) श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्याला स्वतंत्र परिवहन कायदा असावा यासाठी शासन प्रयत्नशील असून त्याच्या अभ्यासासाठी राज्याचे अपर मुख्य सचिव (परिवहन) श्री.गौतम चॅटर्जी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, असल्यास, अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय आहे व त्याबाबत पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, उक्त समितीचा अहवाल प्राप्त झाला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व अहवाल केव्हा प्राप्त होणे अपेक्षित आहे ?

**श्री. दिवाकर रावते (२९-०५-२०१७) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र राज्याकरीता स्वतंत्र परिवहन कायदा करण्याच्या हेतूने महाराष्ट्र विधानमंडळाने सन २०१७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात "महाराष्ट्र परिवहन व रस्ते सुरक्षा अधिनियम, २०१७" पारीत केले आहे. सदर विधेयकास राष्ट्रपतींची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर अधिनियम अस्तित्वात येईल.

---

### राज्यातील नगरपालिका/महानगरपालिका क्षेत्रात आदिवासी खातेदारांच्या जमिनीवरील आरक्षणापोटी द्यावयाच्या हस्तांतरणीय विकास हक्क देतांना झालेला गैरव्यवहार

**(३) १११६८ (२३-१२-२०१५) श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कुळगाव-बदलापूर नगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका तसेच अनेक नगरपालिका/महानगरपालिका क्षेत्रात आदिवासी खातेदारांच्या जमिनीवरील आरक्षणापोटी द्यावयाच्या हस्तांतरणीय विकास हक्क देतांना मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदीन्वये आदिवासींचे जमिनीवरील हक्कासंदर्भात शासनाच्या कोणत्याही प्रकारच्या परवानग्या न घेता टी.डी.आर. व डी.आर.सी. देण्यात आल्याची बाब देखील निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात चौकशीनुसार काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०६-२०१७) :** (१) कुळगांव-बदलापूर नगरपालिका वगळता इतर नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रात अशी बाब निदर्शनास आल्याचे दिसून येत नाही.

(२) अशी कुळगांव-बदलापूर नगरपालिका क्षेत्रात आढळून आली असल्याने संबंधित डीआरसी धारकांना दिलेले टिडीआर रद्द करण्यात आले आहे.

(३) व (४) होय.

शासनाकडे अशा स्वरुपाचे निवेदन प्राप्त झाले असून त्यावर संबंधितांचा अहवाल मागविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**फुलेनगर प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथील पार्किंग शुल्कामध्ये होत असलेला गैरव्यवहार**

**(४) ११६३३ (२१-१२-२०१५) श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुलेनगर प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे चारचाकी वाहनांसाठी असलेल्या रुपये दहा पार्किंग शुल्काच्या पावतीवरील एकच्या आकड्यावर तीनचा शिक्का मारुन ती रूपये तीसची केली आहे, त्यामुळे वाहनचालकांच्या पैशाची सर्रास लुट होत असल्याचे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२९-०५-२०१७) :** (१) होय.
(२) व (३) याप्रकरणी संबंधित वाहनतळ कंत्राटदाराचा ठेका रद्द करण्यात आला आहे.

---

**संगमनेर नगरपरिषद (जि.अहमदनगर) येथे पाचवा व सहाव्या वेतन आयोगाचे फरक देण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(५) १३०९१ (२३-१२-२०१५) डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर नगरपरिषद (जि.अहमदनगर) येथे पाचवा व सहाव्या वेतन आयोगाचे फरक देण्यासाठी वसूलीची अट रद्द करुन शासनाने निधी उपलब्ध करुन द्यावा अशी कर्मचारी व अधिकारी यांची मागणी असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीवर निर्णय घेऊन सदर निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१७) :** (१) होय.
(२) व (३) संगमनेर नगरपरिषदेच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे उपदान / पाचव्या व सहाव्या वेतन आयोगाचा सेवानिवृत्तीचा फरक तसेच रजा रोखीकरण या रक्कमा १३ व्या वित्त आयोगाच्या निधीतून देण्याबाबतचा संगमनेर नगरपरिषदेने दिनांक १२/०१/२०१५ रोजी ठराव पारीत केला आहे. तथापि, १३ व्या वित्त आयोगाच्या निधीतून सदर देणी द्यावयाची असल्यास नगरपरिषदेचे संकलीत कर पाणीपट्टी कर वसुलीचे प्रमाण ९० टक्के पेक्षा अधिक

असावे अशी अट दिनांक २५/०८/२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित केली आहे.

नगरपरिषदेने विशेषत्वाने मालमत्ता व पाणीपट्टी करसंकलनासाठी प्रयत्न करुन विहित मर्यादा गाठणे अपेक्षित आहे.

---

## राज्यातील बेघरांसाठी शबरी घरकुल योजना राबविण्याबाबत

**(६) १५७३१ (२७-०४-२०१६) श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे :** तारांकित प्रश्न क्रमांक १२०९५ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बेघर किंवा ज्यांची घरे माती-कुडाची आहेत अशा आदिवासी कुटुंबाना शासन अनुदानातून शबरी घरकुल योजना राबविण्याचा निर्णय आदिवासी विकास विभागाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत दिनांक १ जानेवारी, २०१५ ते ३१ डिसेंबर, २०१५ या कालावधीत किती घरे बांधण्यात आली आहेत,

(३) असल्यास, या घरकुलावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला आहे ?

**श्री. विष्णु सवरा (०७-०६-२०१७) :** (१) होय.

(२) सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या दोन्ही वर्षाचे AwaasSoft वर एकत्रित उद्दिष्ट देण्यात आलेले होते.

| | | सन २०१४-१५ | रु.लाखात |
|---|---|---|---|
| उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण घरकुले | खर्च |
| ११०१ | ८२२ | २७३ | ६१०.११ |

| | सन २०१५-१६ व २०१६-१७ | | |
|---|---|---|---|
| उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण घरकुले | खर्च |
| २१००० | २१०१८ | ५४ | ४२७३.०० |

(३) PFMS प्रणालीद्वारे शबरी आदिवासी घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना बँक खात्यामध्ये निधी वितरण करण्यात येते. दिनांक २०/५/२०१७ रोजीच्या AwaasSoft वरील अहवालानुसार १४,२३४ लाभार्थ्यांना पहिला हफ्ता वितरीत करण्यात आलेला असून या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना रुपये ४२७३.०५ लाख निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

---

## दिंडोशी (मुंबई) येथील वाहतूक नियंत्रण शाखेत कार्यालयात उपस्थित असल्याची खोटी नोंद करण्यात येत असल्याबाबत

**(७) १७५६४ (०३-०५-२०१६) श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिंडोशी (मुंबई) येथील वाहतूक नियंत्रण शाखेच्या वाहतुक चौकीत ड्युटी मास्टर काम करणारे हवालदार श्री.कोळेकर व कॅशिअर श्री.दिनकर हराळे हे कामावर उपस्थित नसताना ते डयूटी बजावत असल्याची खोटी नोंद चौकीचे प्रभारी निरीक्षक श्री.व्ही.जी.शिंदे यांनी अभिलेखावर केल्याबाबची तक्रार पोलीस उपायुक्त, सहआयुक्त वाहतूक यांचेकडे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आवश्यक ते पुरावे तक्रारीसोबत देऊनही संबंधित अधिकाऱ्यांनी दोषी व्यक्तींविरुध्द कारवाई न केल्याने पोलीस आयुक्त, मुंबई, पोलीस महासंचालक व मा.मुख्यमंत्री यांचेकडे या प्रकरणी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित पोलीस हवालदार व कॅशिअर यांचेविरोधात काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच, सदर तक्रारीची दखल न घेणाऱ्या पोलीस उपायुक्त व सहआयुक्त वाहतूक यांचेविरुध्द हेतूत: दिरंगाई, हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्याबद्दल काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) या संबंधात अशा तक्रारी प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.
(३) सह पोलीस आयुक्त (वाहतूक) यांच्याकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सहाय्यक पोलीस आयुक्त, उत्तर परिक्षेत्र (वाहतूक), मुंबई यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे. पोलीस हवालदार, श्री.कोळेकर व श्री.हराळे यांनी दिनांक १२/१२/२०१५ रोजी व्यक्तिगत कारणांकरीता किरकोळ रजेचा अर्ज दिल्याचे व सदर रजेचा अर्ज प्रभारी पोलीस निरीक्षक यांनी मंजूर केल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्याने कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर विभागात खाजगी शिक्षण संस्थांच्या रिकाम्या भूखंडाना नगरपालिका व महानगरपालिकांतर्फे कर आकारण्यात येत असल्याबाबत

**(८) १७९३३ (२९-०४-२०१६) श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर विभागात अनेक खाजगी शिक्षण संस्था असून या संस्थांद्वारे शाळा चालविण्यात येतात व शाळांकरिता या संस्थांजवळ असलेल्या रिकाम्या भूखंडावर नगरपालिका व महानगरपालिकांतर्फे कर आकारण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नगरपालिका व महानगरपालिका हा कर कोणत्या नियमाने आकारतात, शैक्षणिक संस्था व शाळा शिक्षणाचे कार्य सेवाभावनेने करीत असतांना व या शाळांना शासनाकडून अनुदान दिले जात असतांना तसेच या शाळा व्यावसायिक कार्य करीत नसल्याने यांचेकडे उत्पन्नाचे कोणतेही महत्त्वाचे साधन नसतांना या शाळांना कर आकारणी करण्यात येऊन कर न भरल्यास अनेक शाळांना नगरपालिका व महानगरपालिकांतर्फे नोटीसा बजावण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या शाळांचा व त्यांच्या रिकाम्या भूखंडाचा कर माफ करण्याकरिता शासन निर्णय घेणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.प. ५ (६)

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ व त्याखालील नियमानुसार कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील विक्रोळी पार्कसाईट येथे लागलेल्या आगीत मयत झालेल्या कै.संतोष शिंदे यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्याबाबत**

**(९) १९१५१ (२८-०४-२०१६) प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विक्रोळी पार्कसाईट (मुंबई) येथे दिनांक १७ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास लागलेल्या आगीत श्री.संतोष शिंदे या तरुणाने जीवाची पर्वा न करता आगीत अडकलेल्या नागरिकांना मदत करताना स्वत:चा जीव गमावल्याने त्यास विशेष बाब म्हणून मदत करण्याबाबत दिनांक १८ डिसेंबर, २०१५ रोजीच्या लक्षवेधी सूचनेवर विचारलेल्या प्रश्नावर मा.राज्यमंत्री (शहरे) यांनी सत्यता वाटली तर शासन निश्चितपणे सकारात्मक कार्यवाही, असे उत्तर दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची सत्यता शासनाकडून तपासण्यात आली आहे काय व या सत्यतेनुसार कै.श्री.संतोष शिंदे यांना कोणत्या स्वरुपाची आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) पार्कसाईट पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १७ ऑक्टोबर, २०१५ रोजी गॅस सिलेंडरची गळती झाल्यामुळे आग लागल्याची घटना घडली असून त्यामध्ये श्री.संतोष शिंदे यांना बचावकार्यात मदत करतांना स्वत:चा जीव गमवावा लागता. याप्रकरणी गु.र.क्र.४३६/२०१५, भा.दं.वि.कलम ३०४(अ), ३३८ व ३३७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
या प्रकरणी मानवतावादी दृष्टीकोनातून श्री.संतोष शिंदे यांच्या कायदेशीर वारसांस मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून रु.एक लक्ष इतकी आर्थिक मदत करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील शिल्प उद्यानाबाबत**

**(१०) १९४८६ (१९-०८-२०१६) प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथे कॅम्प ४, प्रभाग २८ मध्ये ऐतिहासिक वारसा जपणारे जिजामाता उद्यान साकारले असून त्या उद्यानात शिवकालीन भिंती शिल्प काढण्यात आली असून त्या शिल्पांमध्ये सय्यद बंडाचा हवेत हात उडविल्याच्या शिल्पाचा समावेश करावा अशी मागणी नाभिक समाज व स्थानिक लोकप्रतिनिधींनी गेल्या २ वर्षापासून करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिल्प उद्यानात उक्त भिंती शिल्पाचा समावेश करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात जागेच्या उपलब्धतेप्रमाणे जिजामाता उद्यानात ऐतिहासिक वारसा जपणारे अफझलखानाचा वध, शायिस्तेखानाची फजिती, वीर जिवाजी महाले व वीर शिवाजी काशिद यांचे संकल्पशिल्प बसविण्याकरीता शिल्पाचे मॉडेल तयार करण्याचे काम मे.स्टॅण्डर्ड म.का.स.संस्था यांचेमार्फत सुरु करण्यात आले आहे.

---

**ग्रँटरोड, कामाठीपूरा (मुंबई) येथील 'गुलमोहर' इमारत कोसळून अपघात झाल्याबाबत**

**(११) १९७१२ (२३-०८-२०१६) श्री.प्रकाश गजभिये, श्री.जनार्दन चांदूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रँट रोड, कामाठीपुरा (मुंबई) येथील तीन मजली 'गुलमोहर' इमारत कोसळून सहा जण ठार तर दोन जण गंभीर जखमी झाल्याची घटना दिनांक ३० एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले व तद्नुसार मृतांच्या कुटुंबियांना तसेच जखमींना औषधोपचारासाठी कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१७) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) कोसळलेली इमारत ही सन १९४० च्या पूर्वीची असून त्यावेळी उपलब्ध साधनसामुग्रीचा वापर करुन बांधण्यात आली होती. या इमारतीतील लाकडी खांब तुळ्या व भारवाहक भिंतीचे भाग कमकुवत झाल्यामुळे सदर इमारत अचानकपणे कोसळल्याचा निष्कर्ष आहे.

या इमारतीच्या दुरुस्तीचे काम करणारे कंत्राटदार यांनी इमारतीच्या दुरुस्तीच्या कामावेळी कामगारांच्या सुरक्षिततेबाबत योग्य ती खबरदारी न घेतल्याने त्यांचेविरुध्द गु.र.क्र. १४८/१६ कलम २८८, ३०४(अ), ३३८, ३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस मा.न्यायालयाने जामीन मंजूर केल्याने आरोपी सध्या जामीनावर आहे. आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.

सदरची घटना नैसर्गिक आपत्तीमध्ये मोडत नसल्याने मृत व्यक्तींच्या वारसांना तसेच जखमींना आर्थिक मदत देय होत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील महापालिकांमध्ये आरक्षणाप्रमाणे अनुसूचित जाती या प्रवर्गाकरिता नगरसेवक पदाच्या आरक्षित जागा ठेवण्याबाबत

**(१२) १९७६२ (२३-०८-२०१६) श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २६ महापालिकांमध्ये अनुसूचित जाती या प्रवर्गाकरिता नगरसेवक पदाच्या १३ टक्क्यांप्रमाणे ३३८ जागा राखीव ठेवणे आवश्यक असताना फक्त २६० जागा राखीव ठेवण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून राज्यातील महापालिकांमध्ये १३ टक्क्यांप्रमाणे नगरसेवक पदाच्या ३३८ जागा आरक्षित ठेवणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१७) :** (१) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १९८८ मध्ये कलम ५(ए) तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ५(३) मधील तरतूदींच्या आधारे राज्यातील २६ महानगरपालिकांमध्ये अनुसूचित जाती प्रवर्गासाठी एकूण २६८ जागा आरक्षित करण्यात आल्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने अहवाल सादर केला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनाच्या नवीन बंदर धोरणाबाबत

**(१३) १९९१२ (२३-०८-२०१६) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्याचे नवे बंदर धोरण तयार केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोरणाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उक्त धोरणाच्या अनुषंगाने जेएनपीटी व एमटीडीसीतर्फे चालविण्यात येणारी ॲम्फिबिअन बस, रेवदंडा येथे सागरी व्यापारासाठी स्वतंत्र धक्का यासह एकुण १८ हजार कोटी रुपयांच्या बंदर विकासाशी निगडीत प्रकल्पांविषयी मा.मुख्यमंत्री यांनी करार झाल्याची घोषणा दिनांक १५ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास मेरीटाईम इंडिया परिषदेत केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कराराचे एकुण स्वरुप काय आहे व किती कालावधीत उक्त कराराच्या अनुषंगाने बंदर विकासाच्या नव्या मार्गाचे काम पुर्ण होणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :** (१) होय.

(२) व (३)

१. नवीन बंदर विकास धोरणात हरितक्षेत्र बंदरे, बहुउद्देशीय जेट्टी, स्वनियंत्रित धक्के या मुख्य क्षेत्रांसह शिपयार्ड, अंतर्गत जलवाहतूक, कोस्टल इकोनॉमिक झोन या विविध उपक्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे.

२. जेएनपीटी व एमटीडीसीतर्फे चालविण्यात येणारी ॲम्फिबिअन बस ही बंदर विकास धोरणाशी संबंधित बाब नाही.

३. इंडो एनर्जी कंपनीकडून रेवदंडा येथे सागरी व्यापारासाठी कॅप्टीव्ह जेट्टी प्रकल्पाबाबत करार करण्यात आला आहे.

४. सात बंदर विकासकांशी सामंजस्य करार स्वाक्षांकीत करण्यात आले आहे. सदर प्रकल्पांसाठी रुपये १४ हजार कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

(४) सामंजस्य करार करण्यात आलेल्या सर्व विकासकांकडून पर्यावरण दाखला तसेच इतर संबंधित विभागांकडून दाखले प्राप्त करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) परिसरातील राज्य परिवहन महामंडळाच्या डेपोत सोयीसुविधा पुरविण्याबाबत**

**(१४) २०३५२ (१६-०८-२०१६) श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) परिसरातील राज्य परिवहन महामंडळाच्या डेपोत सोयीसुविधा पुरविण्याकडे परिवहन महामंडळाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे सदर मोक्याच्या जागेवरील एसटी डेपो शहराबाहेर स्थलांतरीत करुन एसटी डेपोची जमीन भूमाफिया ताब्यात जाण्याची बाब माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.परिवहन राज्यमंत्री यांनी कल्याण शहराबाहेर आगार विकसित करण्यासाठी (डेपो पोर्टचा) एक प्रस्ताव तयार करण्याचे आदेश परिवहन अधिकाऱ्यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार एसटी डेपोला आवश्यक सोयीसुविधा पुरविण्याबाबत तसेच, भुमाफियांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२९-०५-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) राज्य परिवहन महामंडळाच्या कल्याण बसस्थानकात प्रवाशांकरीता प्रतिक्षालयात बसण्यासाठी मार्बलची आसनव्यवस्था लाईट, पंखे, पिण्याचे पाणी, उपहारगृह, तिकीट आरक्षण व्यवस्था, चौकशी कक्ष, हिरकणी कक्ष, पुरुष व महिला प्रवाशांकरीता प्रसाधनगृह, पार्सल कक्ष, पोलीस चौकी, काँक्रिटीकरण केलेला वाहनतळ इत्यादी सुविधा आहेत. प्रसाधनगृह चालकांकडून बसस्थानकाची स्वच्छता मोफत केली जाते. आवश्यकतेनुसार वेळोवेळी बसस्थानकाची दुरुस्ती करण्यात येते.

कल्याण आगार शहराबाहेर विकसित करण्याबाबतचा प्रस्ताव महामंडळाच्या विचाराधिन नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील गुलजारी नदीवरील पुलावर अवजड वाहनांची बेकायदा होणारी पार्किंग हटविण्याबाबत

**(१५) २१३४३ (२३-०८-२०१६) श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद महामार्गावर चारोटी नाक्याजवळील गुलजारी नदीवरील पुलावर दोन्ही बाजूनी बेकायदेशीररित्या अवजड वाहनांची पार्किग होत असल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर अवजड वाहनांची बेकायदा पार्किंग तात्काळ हटविण्यासाठी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१७) :** (१) मुंबई अहमदाबाद महामार्गावर चारोटी नाक्याजवळील गूलझारी नदीवरील पुलावरील वाहतूक सुरळीत असून बेकायदेशीररित्या पार्किंग करणाऱ्या वाहन चालकांवर मोटार वाहन अधिनियमाखाली कारवाई करण्यात येत आहे.

सदर पुलावर किरकोळ किंवा गंभीर अपघात झाल्याबाबतची नोंद नाही.

(२) चारोटी नाका हे मुंबई-अहमदाबाद महामार्ग व डहाणू-जव्हार मार्गावरील मध्यवर्ती ठिकाण असल्याने या ठिकाणी नेहमी वर्दळ असते. काही वाहनचालक हे रस्त्याचे कडेला वाहन थांबवित असल्याचे आढळल्याने त्यांचेविरुध्द मोटार वाहन कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात येते. गुलझारी नदीवरील पुलावर बेकायदेशीर पार्किंग होऊ नये याकरिता सदर ठिकाणी योग्य ती पोलीस बंदोबस्त नेमण्यात आलेला आहे.

सन २०१३ ते माहे ऑगस्ट, २०१६ या कालावधीत बेकायदेशीरित्या पार्किंग केलेल्या वाहनांवरील कारवाईची माहिती पुढीलप्रमाणे :-

| सन | केसेस | दंड (रु.) |
|---|---|---|
| २०१३ | १५० | १५००० |
| २०१४ | २१० | २१००० |
| २०१५ | ४४४ | ४४४०० |
| २०१६ (ऑगस्टपर्यंत) | १८५७ | १८५७०० |

सन २०१६ मध्ये विशेष मोहिम राबविण्यांत आल्यामुळे केसेसची संख्या वाढलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई पोलीस दलातील वाहन चालकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१६) २१४४१ (२३-०८-२०१६) श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलीस दलात वाहन चालकांची ९५० पदे रिक्त असल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त असलेल्या पदांमुळे सध्या कार्यरत असलेल्या वाहन चालकांवर कामाचा ताण पडत असून त्यांच्या आरोग्याचा प्रश्नही निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदरील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :** (१) व (२) मुंबई पोलीस दलात वाहन चालकांची एकूण मंजूर पदे २८७६ इतकी असून त्यापैकी १७८५ इतके वाहन चालक कार्यरत असून एकूण १०९१ पदे रिक्त आहेत.

तथापि सद्य:स्थितीत सशस्त्र पोलीस दलाकडून ८८७ इतके पोलीस शिपाई चालक प्रतिनियुक्तीवर मोटार परिवहन विभागात उपलब्ध करुन देण्यात आले असून एकूण २०४ इतकी पदे रिक्त आहेत.
(३) बृहन्मुंबई पोलीस दलातील पोलीस शिपाई चालकांची भरती पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई या कार्यालयाकडून करण्यात येते. मोटार परिवहन विभागातील चालकांचा वेगळा संवर्ग निर्माण करणे व त्यांच्या पदभरती करिता नवीन सेवाप्रवेश नियम तयार करण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे. तसेच सद्यस्थितीत पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत प्रस्तावित केल्यानुसार सेवानिवृत्त, मयत व इतर कारणास्तवर रिक्त होणाऱ्या चालकांच्या पदावर परवानाधारक पोलीस शिपायांमार्फत कर्तव्ये करुन घेण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात दिशानिर्देशांचे पालन न करणाऱ्या मोबाईल कंपन्यांवर कारवाई करणेबाबत**

**(१७) २२०५२ (२३-०८-२०१६) आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मोबाईल टॉवर्समधून निघणाऱ्या ईएमएफ उत्सर्जनातून नागरिकांच्या आरोग्यास अपाय होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या मोबाईल कंपन्या दिशानिर्देशांचे पालन करीत नाहीत अश्या कंपन्यांवर सक्तीची कारवाई करुन त्यांच्याकडून दंड आकारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१७) :** (१) व (२) महाराष्ट्र शासनाने अधिसूचना दिनांक ०४ मार्च २०१४ अन्वये महाराष्ट्रातील सर्व नियोजन प्राधिकरणे, विशेष नियोजन प्राधिकरणे, विकास प्राधिकरणे यांच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये दुरसंचार सुविधांच्या उपकरणांची व बेस स्टेशन यांच्या उभारणीसाठीचा सर्व समावेशक विनियम अंतर्भुत करण्यात आलेले आहे. यामधील Electro Magnetic Field Radiation हा मुद्दा DoT / TERM cell यांच्याशी संबंधित आहे. धोरणातील नियम क्र. ७ मध्ये Electro Magnetic Field

Radiation Norms बाबत स्पष्टता केली असून त्यामध्ये DoT या विभागाचे ना हरकत घेणे बंधनकारक केले आहे, तसेच संबंधित मोबाईल धारकांनी DoT / TERM cell यांचे कडून ऑडीट करुन घेणे आवश्यक आहे. या संबंधिची कागदपत्रे संबंधित मोबाईल धारकांनी महानगरपालिकेस उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. असे न केल्यास त्यांच्यावर DoT/TERM cell यांचे कडून कार्यवाही करण्याची तरतुद करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्याबाबत**

**(१८) २२५४१ (१६-०८-२०१६) श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात महावितरण आपल्या दारी या योजनेंतर्गत (इन्फ्रा २) शेतकऱ्यांनी विद्युत जोडणी मिळण्यासाठी कोटेशन भरुन ३ वर्षाचा कालावधी होऊनही वीज जोडणी देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) महावितरण कंपनीमार्फत चौकशी करण्यात आली आहे.
अहमदनगर जिल्हयामध्ये या योजनेंतर्गत ३१,६११ कृषीपंपांना शेतकऱ्यांच्याच केबलद्वारे वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे गोडदेव (ता.भाईंदर, जि.ठाणे) येथील विकासकाने केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(१९) २३४६९ (२४-०८-२०१६) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे गोडदेव (ता.भाईंदर, जि.ठाणे) येथील सर्व्हे क्र.३२७, ३४०, ३२८, ३३९, ३४१ व इतर जागेत विकासकाने यापूर्वीच मागील २० वर्षात विविध बांधकाम परवानगी घेऊन प्रकल्प पूर्ण केलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पामधील प्लॉटचे वेगवेगळे तुकडे करुन एमएमआरडीएकडे चुकीची व खोटी माहिती सादर करुन लेटर ऑफ इन्टेन्ट मिळवली व प्रकल्पासाठी ४ चटईक्षेत्र एमएमआरडीए व महानगरपालिकेकडून घेतले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, १ चटईक्षेत्र सुध्दा शिल्लक नसताना ४ चटईक्षेत्र विकासकाने लाभात पाडून घेतले असून याकरिता एमएमआरडीए व मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे चुकीची व बनावट कागदपत्रे सादर केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, एमएमआरडीएने प्लॉटसाठी स्वतंत्र सब डिव्हीजन करुन मोजणी केलेली नाही व ४ चटईक्षेत्राच्या भूखंडाचा जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून अकृषिक परवानगी घेतलेली

नसून चटईक्षेत्र शिल्लक नसताना स्वतंत्र भूखंड दर्शवून परवानगी प्राप्त केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०६-२०१७) :** (१) मौ.गोडदेव येथील स.क्र.३२७/१, २, ४, ६, ७, ८, ११, १२, १७, १९, २१, २२, २५, स.नं.३२८/२, ३, ४, स.नं.३२९/१ ते ४ अ या ४९०५० चौ.मी.क्षेत्रासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिकेने दिनांक १६/६/२००३ रोजी प्राथमिक मंजूरी दिली होती. तद्नंतर या मंजूर रेखांकनात वेळोवेळी मौ.गोडदेव येथील इतर भूखंड नव्याने समाविष्ट करुन ८१०४० चौ.मी. क्षेत्राकरीता मिरा-भाईंदर महानगरपालिकेने बांधकाम परवानगी दिली आहे. सदर प्रकल्पाचे काम सुरु आहे.
(२) व (३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक १२/९/२०१२ च्या पत्रान्वये या भूखंडावरील १८९८८ चौ.मी. क्षेत्रावर भाडे तत्वावरील घरे योजना राबविण्याकरिता लोकेशनल क्लिअरन्स दिले आहे. तसेच दिनांक २२/११/२०१२ च्या पत्रान्वये रेखांकन मंजूरी दिली आहे. सदर प्रकरणी नागरी जमीन कमाल धारणा कायद्यासंदर्भात संबंधित सक्षम प्राधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेऊन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने या प्रकरणी लोकेशनल क्लिअरन्स व रेखांकन मंजूरी दिली असून, सदर प्रकरणी चुकीची व खोटी माहिती सादर करुन लेटर ऑफ इंटेन्ट मिळविले असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(४) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुलाबा (मुंबई) येथील ससुन डॉक या धक्क्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(२०) २४०८८ (३०-१२-२०१६) श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुलाबा (मुंबई) येथील सुमारे १८७५ साली बांधलेल्या “ससुन डॉक” येथे मासळी लिलाव होणाऱ्या धक्क्याची दुरवस्था झाली असून सदर ठिकाणी विद्युत दिवे नसल्यामुळे कोळी बांधव ऐन गर्दीच्या वेळी जीर्ण झालेल्या धक्क्यावरून पाण्यात पडून जिवित हानी होण्याची शक्यता माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर धक्क्याची डागडुजी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१५-०५-२०१७) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि ससून गोदी मासेमारी बंदराच्या आधुनिकीकरणाच्या प्रकल्पास मंजुरी देण्यात आली असून, प्रकल्प व्यवस्थापन व अंमलबजावणी सल्लागारांची नियुक्ती करण्याबाबत महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महापालिकेच्या मुख्यालयासह अन्य कार्यालय, रुग्णालयांमध्ये वायफाय सेवा उपलब्ध करुन देण्याच्या निर्णयाबाबत**

**(२१) २४७७८ (०४-०१-२०१७) श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या मुख्यालयासह अन्य कार्यालय, रुग्णालयांमध्ये वायफाय सेवा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे, सदरील सेवा कोणत्या कालावधीत सुरु होणार आहे,

(३) असल्यास, वायफाय सेवेचा दुरुपयोग होऊ नये याबाबत शासन कोणती खबरदारी घेणार आहे, तसेच दुरुपयोग करणाऱ्या संबंधितांवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयामध्ये मे.एम.टी.एन.एल.यांच्यामार्फत प्रायोगित तत्वावर १५ दिवसांच्या कालावधीकरिता मोफत वायफाय सुविधा इंटरनेट लिंकद्वारे घेण्यात आली होती.

सद्य:स्थितीत महानगरपालिकेच्या सर्व कार्यालयांमध्ये महानगरपालिकेच्या सर्व कार्यालयामध्ये कार्यालयीन कामकाजासाठी मर्यादित स्वरुपात इंटरनेट सुविधा उपलब्ध करण्यात आली असल्यामुळे वेळी वायफाय सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या विचाराधीन नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेट्रो-३ चे प्रस्तावित स्थानकासाठी मुंबई सेंट्रल एसटी आगाराचे स्थलांतर करण्याचा घेतलेला निर्णय**

**(२२) २४८०५ (३०-१२-२०१६) श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई सेंट्रल एसटी आगाराची काही जागा मेट्रो-३ चे प्रस्तावित स्थानक व प्रवाशांच्या सोयीसाठी, नियोजित मार्गासाठी वापरावी लागणार असल्याने या आगारातील वाहतूक अन्यत्र स्थलांतर करण्याचा एसटी महामंडळाने निर्णय घेतल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१२-०६-२०१७) :** (१) व (२) मुंबई सेंट्रल आगारातील वाहतूक अन्वये स्थलांतरीत करण्याबाबत कोणताही निर्णय महामंडळाने घेतलेला नाही.

राज्य परिवहन महामंडळाच्या मुंबई सेंट्रल मध्यवर्ती कार्यालयाशेजारील मध्यवर्ती वाहनकक्ष येथील जमिनीवरील १६६ चौ.मी. व जमिनीखालील ८० चौ.मी. अशी एकूण २४६ चौ.मी. क्षेत्रफळाची जमीन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे कायमस्वरुपी हस्तांतरीत करण्यास महामंडळाने मंजूरी दिली आहे. तसेच १८९ क्षेत्रफळाची जमीन तात्पुरत्या स्वरुपात अशी एकूण ४३५ चौ.मी. क्षेत्रफळाची जमीन मेट्रो-३ मधून येणाऱ्या राज्य परिवहन प्रवाशांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वार्षिक रु. १/- नाममात्र दराने भाडेतत्वावर हस्तांतरीत करण्यास राज्य परिवहन महामंडळाने मे, २०१६ मध्ये मंजूरी दिली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी अपुरे मनुष्यबळ असल्याबाबत**

**(२३) २५१०८ (०४-०१-२०१७) अ‍ॅड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी अपुरे मनुष्यबळ असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार सायबर गुन्ह्याच्या तपास विहित वेळेत व्हावा म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१७) :** (१) व (२) सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी व गुन्ह्यांच्या तपासावर देखरेख ठेवण्यासाठी विशेष पोलीस महानिरीक्षक सायबर यांच्या नियंत्रणाखाली स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे.

महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पांतर्गत दिनांक १५/०८/२०१६ रोजी राज्यात सर्व जिल्हा पोलीस मुख्यालये व पोलीस आयुक्तालयात एकूण ४७ सायबर लॅब सुरु करण्यात येऊन त्यापैकी ४४ लॅबना सायबर पोलीस ठाणे घोषित करण्यात आले आहे.

सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी मनुष्यबळाची कमतरता भरुन काढण्याच्या दृष्टीने नागरी संरक्षण संचालनालयातील १०९ पदे पोलीस दलातील समान वेतनश्रेणीच्या पदांमध्ये रुपांतरीत करुन, विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर व महिला अत्याचार प्रतिबंध, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवर स्थानांतरीत करण्यास शासन निर्णय दिनांक ४/३/२०१७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामीण भाग शहरी भागाला जोडणाऱ्या एसटी महामंडळाने मोठ्या प्रमाणात सुसूत्रीकरणाचे धोरण अवलंबिल्याबाबत**

**(२४) २५५८२ (३०-१२-२०१६) श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भाग शहरी भागाला जोडणाऱ्या एसटी महामंडळाने मोठ्या प्रमाणात सुसूत्रीकरणाचे धोरण अवलंबिले असल्याने अनेक लांब पल्लाच्या फेऱ्या कमी करण्यात आल्या असून त्याचा परिणाम प्रवाशांवर होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील आगारांचा आढावा घेतला असून ३० किमी च्या आत असणाऱ्या एकापेक्षा जास्त आगारापैकी एक आगार बंद केले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी प्रवाशांची होणारी गैरसोय लक्षात घेता महामंडळाचे सदर निर्णय मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२९-०५-२०१७) :** (१) राज्य परिवहन मुंबई प्रदेशातील सर्व विभाग नियंत्रक, विभागीय वाहतूक अधिकारी व सहाय्यक वाहतूक अधिकारी यांची सुसूत्रीकरणाबाबत बैठक होऊन ज्या फेऱ्यांना थेट प्रवासी संख्या कमी आहे अशा लांब व मध्यम लांब पल्ल्यांच्या फेऱ्यांना पुरेसा थेट प्रवासी प्रतिसाद उपलब्ध नाही अशा लांब व मध्यम लांब फेऱ्या स्थगित करण्यात आल्या आहेत.

(२) नाही.

(३) लांब व मध्यम लांब फेऱ्या स्थगित केल्यामुळे स्थानिक मार्गावरील प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून पॉकेट निहाय फेऱ्या सुरु ठेवण्यात आलेल्या आहेत. यामुळे प्रवाशांची कोणतीही गैरसोय झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नालासोपारा येथे ७/१२ उताऱ्यावर फेरफार करुन महापालिकेची फसवणूक केल्याबाबत**

**(२५) २५६५५ (०४-०१-२०१७) श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालासोपारा पश्चिमेतील महात्मा फुले नगरात सर्वे क्र.३४/१ मधील रस्त्याखालील ५२३४ चौ.मी. जागा श्री.चंद्रकांत वाळींजकर, श्री.कृष्णा वाळींजकर यांनी ७/१२ उताऱ्यावर फेरफार करुन मयत श्री.कृष्णा वाळींजकर यांच्या नावे कुळमुखत्यारपत्र बनवून महापालिकेची फसवणूक करुन टीडीआर मिळवून सदर टीडीआर विरार येथील श्री.महादेव गोपाळ पाटील, नालासोपारा येथील आदीराज लक्ष्मी डेव्हलपर्सचे श्री.निलेश पटेल आणि महावरी डेव्हलपर्सचे श्री.जितेंद्र जैन यांना १ कोटी ८४ लाख रुपयाला विकून गैरव्यवहार केल्याचे नालासोपारा पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीनुसार झालेल्या तपासातून निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोगस व बेकायदेशीर कागदपत्रे तयार करुन त्या कागदपत्रांची सत्यता पडताळून न बघता सदर जागा महापालिकेकडे हस्तांतरीत करुन घेऊन त्यांना ३४५१ चौ.मी. जागेचा बेकायदेशीर टीडीआर देणाऱ्या महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांविरोधात बेजबाबदार काम केल्याबद्दल काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, या प्रकरणी नालासोपारा तलाठयाने बनावट कागदपत्रे तयार करण्याकरिता

केलेल्या मदतीबद्दल त्यांचेविरोधात तसेच बनावट कागदपत्रे तयार करुन महापालिकेची व टीडीआर विकत घेणाऱ्या खरेदीदारांची फसवणूक करणाऱ्या वाळींजकर कुटुंबियांकडून १ कोटी ८४ लाख रुपये वसुल करण्यात आले आहेत काय,
(४) असल्यास, ज्या ३४५१ चौ.मी. जागेचा बोगस कागदपत्रे तयार करुन सदर जागा महापालिकेस हस्तांतरीत केल्याचे दाखवून टीडीआर मिळविण्यात आला होता, त्या जागेवर बांधकाम कोणत्याही व्यक्ती वा संस्थेस परवानगी देण्यात येऊ नये असा निर्णय महापालिकेने घेतला आहे काय, तसेच महापालिका व खरेदीदारांची फसवणूक करणाऱ्या व त्यांना सहाय्य करणाऱ्या तलाठी व महापालिकेच्या अधिकाऱ्यांविरोधात कोणती कारवाई करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१७) : (**१) होय, हे खरे आहे.

सदरहू प्रकरणी फिर्यादी यांची जागा रु. १ कोटी ८६ लाख रुपयाला विकून त्याची फसवणूक केलेबाबत नालासोपारा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल आहे.
(२), (३) व (४) वरील अनुषंगाने नालासोपारा पोलीस ठाणे गुरनं. I१७५/२०१६ भा.दं.वि.सं. क. ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असून तपास सुरु आहे.

सदर प्रकरणी बनावट कुलमुखत्यार पत्राचे आधारे शासनाची फसवणूक झाली असल्याचे निदर्शनास आल्यामुळे तत्कालीन तलाठी नालासोपारा यांनी फेरफार क्र. ११९५ चे पुनर्विलोकन करण्याबाबत अहवाल सादर केल्यानुसार, उपविभागीय अधिकारी, वसई यांच्यास्तरावर सदर पुनर्विलोकनाची प्रक्रिया सुरु आहे. तत्कालीन तलाठी सोपारा यांनी कोणतेही गैरकृत्य जाणिवपूर्वक केल्याचे निदर्शनास न आल्यामुळे त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात आलेली नाही.

तथापि, फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने महानगरपालिकेने बांधकाम परवानगीमध्ये अनुज्ञेय केलेला TDR वापरणेस तुर्त स्थगिती दिलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रीय (एन.एस.एस) सेवा उपक्रमात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण देणेबाबत**

**(२६) २६०१४ (१६-१२-२०१६) श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयात अकरावी व बारावीच्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यासाठी राष्ट्रीय सेवा (एन.एस.एस.) योजनचे उपक्रम सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठ स्तरावर राष्ट्रीय सेवा (एन.एस.एस.) योजनेत सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना गुणपत्रकामध्ये १० गुणाची वाढ दिली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठ स्तरावरील राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी विद्यार्थ्याप्रमाणे अकरावी व बारावीच्या वर्गात शिकणा-या विद्यार्थ्यासाठी राष्ट्रीय सेवा ( एन.एस.एस.) योजनेत सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना वाढीव गुण देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०६-२०१७) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) क्रीडा क्षेत्र, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना मध्ये भाग घेणारे विद्यार्थी यांना अतिरिक्त गुण देण्याबाबत सर्वकष धोरण ठरविण्याच्यादृष्टीने एक संयुक्त समिती गठित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाने पुनर्विकासासाठी दिलेल्या एन.ओ.सी संदर्भात माहिती मिळण्याबाबत**

**(२७) २६६२१ (०७-०१-२०१७) श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुर्नरचना मंडळाने विकासकांना दिनांक १ एप्रिल, २००० ते ३१ मार्च, २०१४ या काळात प्रत्येक वर्षात किती प्रकल्पांना पुनर्विकासासाठी एन.ओ.सी दिली,
(२) त्या प्रत्येक वर्षात दिलेल्या एन.ओ.सी पैकी प्रकल्पांमध्ये किती पात्र रहिवाशांना घरे देण्यात आली आहेत,
(३) या पुनर्विकास प्रकल्पामध्ये विक्रीसाठी बांधलेल्या इमारतीमधील किती घरे विकण्यात आली आहेत,
(४) प्रत्येक दिलेल्या एन.ओ.सी मध्ये अजुन किती पात्र रहिवाश्यांना अजुन घरे देण्यात आलेले नाहीत ?

**श्री. प्रकाश महेता (२४-०५-२०१७) :** (१) मुंबई इमारत व दुरुस्ती पुनर्रचना मंडळातर्फे दिनांक १ एप्रिल, २००० ते ३१ मार्च, २०१४ या काळात जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता १२६१ प्रकल्पांना ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे.
(२) आतापर्यंत ना-हरकत प्रमाणपत्र दिलेल्या ३५३ प्रकल्पामध्ये ४९५ जुन्या उपकर प्राप्त इमारतीची पुनर्बांधणी करण्यात आली असून त्याद्वारे ८७७७ भाडेकरु/रहिवाश्यांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे.
(३) ना-हरकत प्रमाणपत्र धारकाने विक्रीसाठी बांधलेली किती घरे बांधली वा विकली ही बाब मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीत येत नाही.
(४) उर्वरित ९०८ प्रकल्पांतील १६६३ उपकरप्राप्त इमारतींमधील ३५८०२ भाडेकरु/रहिवाश्यांचे पुनर्वसन अद्याप झालेले नाही.

---

**मागास भागातील शासन मान्य शाळांना अनुदान देण्याबाबत**

**(२८) २६६३० (२४-०१-२०१७) श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मागास भागातील शाळांना मागील १३ ते १४ वर्षापासून मान्यता मिळूनही अनुदान देण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १०० टक्के आदिवासी विद्यार्थी असलेल्या या शाळांना अनुदान देण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) दिनांक १४ जून, २०१६ पूर्वी अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना शासन निर्णय दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ अन्वये सरसकट २० टक्के अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले. शासन निर्णय दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ अन्वये सदर शाळाना अनुदान वितरीत करण्यात आले
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जेएसडब्ल्यु इस्पात कंपनीचे विद्युत शुल्क माफ केल्याबाबत**

**(२९) २६७१५ (१२-०४-२०१७) श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जेएसडब्ल्यु इस्पात कंपनीचे रुपये ५७२ कोटी इतके नियमबाह्य विद्युत शुल्क माफ केल्यासंदर्भात संबंधिताविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी पूर्ण झाली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०६-२०१७) :** (१) व (२) संबंधितांविरुध्द विभागीय चौकशी चालू करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मान्यता प्राप्त अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वेतनेत्तर अनुदान देण्याबाबत**

**(३०) २६७३५ (१२-०४-२०१७) श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १९ जानेवारी, २०१३ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील मान्यता प्राप्त अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना ४ टक्के वेतनेत्तर अनुदान देण्याबाबतचा निर्णय झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शासन निर्णयाने दिनांक १ एप्रिल, २००८ रोजीच्या १०० टक्के अनुदानावर असलेल्या शाळांनाच वेतनेत्तर अनुदान दिले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार दिनांक १ एप्रिल, २००८ नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शाळांना वेतनेत्तर अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०६-२०१७) :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) शासन निर्णय दिनांक २९ जानेवारी, २०१४ अन्वये १०० टक्के योजनेतर मध्ये वेतन घेणा-या शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या वेतनानुसार दिनांक १ एप्रिल, २००८ रोजी देय असलेल्या ५ व्या वेतन आयोगानुसार वेतन अनुदान गोठवून त्यानुसार ५ टक्के वेतनेत्तर अनुदान अनुज्ञेय आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे वाढीव २५ गुण देण्याबाबत**

**(३१) २६९६९ (१२-०४-२०१७) डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे वाढीव २५ गुण मिळण्यासाठी विभागीय स्पर्धा घेणेबाबतची अट रद्द करावी, या मागणीच्या अनुषंगाने शासनस्तरावरून प्रस्तावित असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे वाढीव २५ गुण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०६-२०१७) :** (१), (२) व (३) क्रीडा सवलतीचे गुण, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजनामध्ये भाग घेणारे विद्यार्थी यांना अतिरिक्त गुण देण्याबाबत सर्वकष धोरण ठरविण्याच्यादृष्टीने संयुक्त समिती गठित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अनुसूचित जाती उपयोजनेच्या अखर्चित अनुशेष निधीबाबत**

**(३२) २७०२५ (१२-०४-२०१७) श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत मागील ३ वर्षातील एकूण मंजूर निधी, खर्च झालेला निधी व शिल्लक निधी याबाबतची माहिती मिळण्याबाबत माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान संबंधित विभागाकडे पत्राद्वारे विचारणा करण्यात आली होती, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सन २००३-०४ ते २०१५-१६ या वित्तीय वर्षात अनुसूचित जाती उपयोजनेत लोकसंख्येनुसार न दिलेला तसेच दिलेला परंतू खर्च न झालेल्या निधीच्या अनुशेषाची रक्कम रुपये १२ हजार कोटी इतकी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा अनुशेष निधी आगामी अर्थसंकल्पात उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-०६-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. सन २००३-०४ ते २०१५-१६ या वित्तीय वर्षात अनुसूचित जाती उपयोजनेबाबत लोकसंख्येनुसार नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. वरील वित्तीय वर्षातील अखर्चित नियतव्यय रुपये ११६१९.३६ कोटी एवढा आहे व वितरीत अर्थसंकल्पित तरतूदीपैकी अखर्चित निधी रुपये ३९९५.६९ कोटी एवढा आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही..

---

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी वास्तव्य केलेल्या सिताबर्डी (नागपूर) येथील जुने श्याम हॉटेल याला राष्ट्रीय संरक्षित स्मारक घोषित करण्याबाबत**

**(३३) २७१५५ (१३-०४-२०१७) श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी वास्तव्य केलेल्या सिताबर्डी (नागपूर) येथील जुने श्याम हॉटेल याला डॉ.आंबेडकर राष्ट्रीय संरक्षित स्मारक घोषित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास माहे एप्रिल, २०१२ मध्ये वा त्यादरम्यान पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाला शासनाने मंजुरी दिली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०५-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) या अनुषंगाने, दिनांक २२ जून, २०१५ च्या पत्रान्वये व पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या (दि.११/६/२०१५) टिप्पणीनुसार त्यांचे विभागामार्फत राज्यातील ऐतीहासिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्वाच्या व पुरातत्व शास्त्र दृष्ट्या महत्वाच्या वास्तूंना राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषीत करण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याने व महानगरपालिकेचा प्रस्ताव हा "राष्ट्रीय स्मारक" घोषित करण्याबाबतचा असल्याचे नागपूर महापालिकेला कळविण्यात आले आहे.

त्यानंतर जुने श्याम हॉटेल इमारतीस डॉ.बाबासाहेब आंबेडकर "राष्ट्रीय संरक्षित स्मारक" घोषित करण्याबाबत पारित ठराव क्र.३८२ दिनांक ३१/१२/२०१६ अन्वये महापालिकेने दिनांक २८/०२/२०१७ च्या पत्रान्वये आवश्यकतो प्रस्ताव पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे पाठविला आहे.

प्राप्त प्रस्तावानुसार विषयाधीन वास्तू "राष्ट्रीय संरक्षित स्मारक" घोषित केल्यास त्या वास्तूचा ताबा भारतीय पुरातत्व संर्वेक्षण कार्यालयाकडे जातो व अशा स्थितीत याचा ताबा महापालिकेकडे राहू शकत नाही तसेच यानुषंगाने इतर मुद्याबाबतचा पर्यटन विभागाने दिनांक २९/०३/२०१७ च्या पत्रान्वये नागपूर महानगरपालिकेकडून अहवाल मागविला असून, त्यानुसार महापालिकास्तरावर पुढील कार्यवाही सुरु असल्याचे, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

---

**राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये अध्यापकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३४) २७२७२ (१२-०४-२०१७) श्री.शरद रणपिसे, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने तंत्र शिक्षणात समाविष्ट असणाऱ्या कॉलेजांना मान्यता देण्याची नियमावली माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान जाहिर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी किती अध्यापक असावे, कोणत्या पायाभूत सुविधा असाव्यात यासाठी एआयसीटीईची नियमावली असून त्यानुसार कार्यवाही होणे आवश्यक असतानाही राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये पन्नास टक्के अध्यापक

नसल्याने विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षक नसून अनेक पायाभूत सुविधांचा अभाव होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी आढावा घेवून राज्यात किती अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत, त्यात किती विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, तसेच यासाठी किती अध्यापक आवश्यक आहेत व प्रत्यक्षात किती पदे भरलेली आहेत व कोणत्या पायाभूत सुविधांचा अभाव आहे याची पाहणी करण्याकरिता एआयसीटीकडे यंत्रणा नसल्याने नियमावलीचे उल्लघंन केल्याचे कशा प्रकारे तपासण्यात येणार आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०६-२०१७) :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
(३) सदर बाब अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अधिकार कक्षेतील असून संबंधित महाविद्यालय ज्या विद्यापीठाशी संलग्नित आहे, त्या विद्यापीठाच्या स्थानिक चौकशी समितीमार्फत दरवर्षी महाविद्यालयाची तपासणी करण्यात येते.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिक येथील गोदावरी नदीपात्र प्रदुषण मुक्त करणेबाबत

**(३५) २७६०० (१३-०४-२०१७) डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंहस्थ कुंभमेळ्याच्या समापनानंतर गोदावरी नदीपात्र पुन:श्च अस्वच्छ, प्रदुषित होवून सर्वत्र केरकचरा, पानवेलीमुळे दुर्गंध निर्माण झाल्याच्या पार्श्वभुमीवर गोदावरी नदी स्वच्छतेबाबत कायमस्वरुपी उपाययोजना करावी अशी स्थानिक नागरिकांकडून मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नदीपात्रात नैसर्गिक पर्यावरणपुरक प्रवाह नसणे, मलवाहिन्यांची वहन क्षमता मोठ्या प्रमाणात बाधित होणे, आवश्यक दुषित सांडपाणी शुध्दीकरण यंत्रणा कार्यान्वयीत नसणे, नदीपात्र स्वच्छतेसाठी पुरेशी यंत्रणा नसणे या व अशा विविध कारणांमुळे या नदीचे पात्र कायम प्रदुषित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर नदी प्रदुषण मुक्तीसाठी विविध उपायांबरोबरच सिंहस्थ कालावधीत बांधण्यात आलेले घाट व त्यालगतची जागा देखभालीसाठी महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांना करण्यात आलेल्या विनंतीनुसार सदरहु बाबतीत कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(४) असल्यास, नदीमधील वाढणाऱ्या पानवेली काढण्यासाठी निविदा काढून एजन्सी निश्चिती करण्यात आली आहे काय व प्रत्यक्ष स्वच्छतेचे काम सुरु करण्यात आले आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१७) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) सिंहस्थ कालावधीत बांधण्यात आलेले घाट देखभालीसाठी महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आले आहेत.

(४) गोदावरी नदीमधील वाढणाऱ्या पानवेली काढण्यासाठी महानगरपालिकेने विविध कामे हाती घेतली आहे. यासाठी नाशिक महानगरपालिकेने महासभेची प्रशासकीय मान्यता घेतली असून, निविदा काढून, एजन्सीमार्फत कामे करण्याचे प्रस्तावित आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेची वाहने व मनुष्यबळ वापरून गोदावरी स्वच्छतेची कामे सुरू आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील नगरसेवकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत**

**(३६) २८००३ (१७-०४-२०१७) डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरसेवकांच्या मानधनात वाढ करणेबाबतच्या विचाराधीन प्रस्तावावर शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय,
(२) असल्यास, प्रश्नोक्त मागणीचे अनुषंगाने कोणता निर्णय घेण्यात आला व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०१७) :** (१), (२) व ३) सदर प्रस्ताव शासनस्तरावर तपासण्यात येत आहे.

---

**शहरातील मुख्य रस्त्यावर बसविण्यात आलेले सिग्नल बंद असल्याबाबत**

**(३७) २८०९६ (२६-०४-२०१२) श्री.हेमंत टकले, श्री. विक्रम काळे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड शहरात वाहतूक सुधारण्यासाठी नगरपरिषद व पोलीस दलाकडून शहरातील मुख्य रस्त्यावर तीन ठिकाणी बसविण्यात आलेले सिग्नल बंद आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शहरातील मुख्य रस्त्यावर मृतावस्थेत असलेले सिग्नल सुरु करणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील स्वच्छ भारत अभियानाबाबत**

**(३८) २८१४४ (१९-०४-२०१७) श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत राज्य शासनाने मुंबई, ठाणे, पुणे, नाशिकसह ४४ शहरांमध्ये, घनकचरा व्यवस्थापन, पर्यावरण, स्वच्छता, इत्यादी निकष पूर्ण करण्यासाठी परिश्रम घेवून विशेष कार्यवाही केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने महत्वाच्या ४४ शहरांमध्ये स्वच्छतेबाबतचे निकष पूर्ण करण्यासाठी किती रूपयाचा निधी उपलब्ध करून दिला आहे व त्या निधीतून कोणकोणती कामे करण्यात आली आहेत,
(३) असल्यास, सदरहू शहरे कायमस्वरूपी स्वच्छ रहावी यासाठी शासनाने कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१७) :** (१) केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियानांतर्गत हागणदारी मुक्त शहर, घनकचरा व्यवस्थापन इत्यादी निकषांवर देशातील ५०० अमृत शहरांचे सर्वेक्षण जानेवारी, २०१७ मध्ये करण्यात आले आहे. यामध्ये राज्यातील ४४ अमृत शहरांचा समावेश होता.
(२) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत राज्यातील ४४ अमृत शहरांना हागणदारी मुक्त होण्यासाठी सुमारे रूपये २४४ कोटी एवढा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच या शहरांपैकी नागपूर व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविण्यासाठी रूपये ६७.२५८४ कोटी एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे.
(३) सदरहू शहरे कायम स्वरूपी स्वच्छ राहावीत म्हणून या शहरातील घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी घनकचरा व्यवस्थापनांतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून, त्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक शहरातील गोदावरी नदीवरील घाट, मैदाने आणि साधुग्रामसह इतर सर्व मोकळे भूखंड जतन करुन त्यांची नियमित देखभाल करणेबाबत

**(३९) २८२०२ (१३-०४-२०१७) श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेच्या महसुलात वाढ होण्यासाठी व पर्यटनाच्यादृष्टीने नाशिक शहरातील गोदावरी नदीवरील घाट, मैदाने आणि साधुग्रामसह इतर सर्व मोकळे भूखंड जतन करुन त्याची नियमित देखभाल करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनास निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :** (१) होय.
(२) या जागा विकसित करण्याबाबत नाशिक महानगरपालिकेकडून कार्यवाही प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भोसा (जि.यवतमाळ) परिसरातील दोन मुलींचे अपहरण करण्यात आल्याबाबत

**(४०) २८३०६ (१३-०४-२०१७) श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोसा (जि.यवतमाळ) परिसरातील दोन मुलींचे अपहरण करण्यात आल्याची घटना माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भोसा परिसरात सातत्याने छेडखानीचे प्रकार सुरु असून महिला सेलकडे येथील नागरिकांनी तक्रार करूनही कुठलीच कार्यवाही करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक आरोपीचे पोलिसांशी हितसंबंध असल्याने त्यांना अभय दिले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून निष्काळजीपणा करणाऱ्या पोलिसांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०५-२०१७) :** (१) होय,

(२) हे खरे नाही,

भोसा परिसरात छेडखानीचे प्रकार सुरु असल्याची कोणतीही तक्रार महिला सेलकडे प्राप्त नाही. छेडखानी घटनांना आळा घालण्यासाठी दामिनी पथक कार्यरत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) भोसा परिसरातील दोन मुलींचे अपहरण प्रकरणी पोलीस स्टेशन वडगांव रोड येथे तक्रार प्राप्त होताच गु.र.क्र.३६/२०१७ कलम ३६३, ३५४अ, ५०६, ३४ भादंवि सह कलम ८ पोक्सो कायदा प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आले आहे. गुन्हयातील दोन्ही आरोपींना अटक करण्यात आले आहे. पोलीसांकडून कोणालाही अभय देण्यात आले नाही. पोलीसांनी कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याचे आढळून आले नसल्याने पोलीसांवर कारवाई करण्यात आली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विविध विभागांनी मंजूर निधी अखर्चित ठेवल्याबाबत

**(४१) २८५८८ (१५-०४-२०१७) श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महसुल, वने, पर्यावरण, पाणीपुरवठा, पर्यटन व सांस्कृतिक, अल्पसंख्याक या विभागांनी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेला निधी डिसेंबर,२०१६ अखेर पर्यंत अल्प प्रमाणात खर्च केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागाने मंजूर निधीपैकी अल्प निधी खर्च करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मंजूर निधी खर्च न करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०६-२०१७)** : (१), (२), (३) व (४) वर्षाच्या सुरुवातीस सर्व प्रशासकीय विभागांना आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. अंदाजपत्रकातील काही कामांवरील खर्च हा पासाळ्यानंतर सुरु होतो. केंद्र पुरस्कृत योजनांवरील खर्च हा अपेक्षित केंद्रीय निधी प्राप्त झाल्यानंतर तसेच योजनेची प्राथमिक तयारी व अपेक्षित मान्यता प्राप्त झाल्यानंतर सुरु होतो. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक आचारसंहितेमुळे खर्चावर परिणाम झाल्याचे दिसून येते. प्रश्नाधीन पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या योजनांसाठी खर्च कमी दिसून येतो. वर्षाअखेरीस तो ५० टक्के इतका आहे. महसूल व वन विभागांतर्गत मदत व पुनर्वसनासाठी अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या निधीमध्ये समाधानकारक पावसाळा व त्यानुषंगाने जलयुक्त शिवार व जलसंधारणाची झालेली कामे इत्यादी बाबीमुळे बचत झालेली आहे. वर्षअखेर महसूल व वन विभागाचा खर्च ५७ टक्के इतका आहे. पर्यावरण विभागातील प्रदूषण मुक्ततेसाठी नविन योजनांच्या प्राथमिक तयारीसाठी विलंब झाल्याने विभागाचा खर्च कमी असला तरी वर्षाअखेरीस त्याचे प्रमाण ९१ टक्के इतके आहे. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागातील गड किल्ल्यांच्या दुरुस्तीची कामे तसेच पुरस्कार प्रदान कार्यक्रम यावरील खर्च अनुकमे पावसाळा व निवडणूक आचार संहिता यामुळे सुरुवातील होवू शकला नसला तरी वर्षअखेरीस विभागाच्या खर्चाचे प्रमाण ९३ टक्के इतके आहे. अल्पसंख्यांक विभागाचा खर्चही वर्षअखेरीस ८३ टक्के इतका आहे.

प्रशासकीय विभागांनी वर्षाच्या सुरुवातीस उपलब्ध करुन दिलेल्या निधीच्या खर्चाचे नियोजन करणे अपेक्षित असून निधी वितरणामध्ये आर्थिक अनियमितता होऊ नये तसेच वित्तीय शिस्तीचे पालन व्हावे, निधी लाभार्थ्यांच्या खात्यात थेट जमा करावा, महामंडळे/स्वीय प्रपंची खाते/ बँक अकाऊंट इत्यादी ठिकाणी निधी अखर्चित न ठेवता तो प्रत्यक्ष खर्च करणे, या अनुषंगाने निधी वितरणाबाबत निदेश देण्यात आलेले आहेत. तसेच प्रशासकीय विभागांनी खर्चाचे प्रमाण योग्यरित्या नियोजित करावे व दर तीन महिन्यांनी सचिव स्तरावर आढावा घ्यावा तसेच वर्षाच्या शेवटच्या महिन्यात प्रमाणाबाहेर खर्च (Rush of Exprnditure) होणार नाही. याची दक्षता घ्यावी, अशा सूचना वेळोवेळी देण्यात आलेल्या आहेत.

---

**ठाणे जिल्ह्यात विनयभंग व बलात्काराच्या गुन्ह्यात वाढ होत असल्याबाबत**

**(४२) २८९५३ (१३-०४-२०१७) ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यात रोज विनयभंग आणि दर दोन दिवसांनी एक बलात्काराचा गुन्हा पोलीस ठाण्यात दाखल होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिलांवर होणाऱ्या गुन्ह्यात घट व्हावी म्हणून अनेक विधायक व धडक मोहिमा शासनाने राबवून देखील त्याचा फारसा परिणाम महिलांवर अन्याय करणाऱ्या प्रवृत्तीवर होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१७) :** (१) ठाणे पोलीस आयुक्त परिसरातील एकुण ५ परिमंडळामध्ये जानेवारी, २०१६ मध्ये बलात्काराचे १० गुन्हे व विनयभंगाची ४४ गुन्हे दाखल होते तर जानेवारी, २०१७ मध्ये बलात्काराचे १० गुन्हे व विनयभंगाचे ४२ गुन्हे दाखल आहेत. जानेवारी २०१६ च्या तुलने जानेवारी, २०१७ मध्ये २ गुन्हयांची घट झाली असून, गुन्हयात वाढ झाली नाही.

(२) महिलावरील अत्याचाराच्या गुन्हयात घट व्हावी म्हणून दामिनी पथक, स्वतंत्र महिला निवारण कक्ष, पोलीस स्टेशन अंतर्गत महिला पोलीस अधिकारी/कर्मचारी गस्त पथक स्थापन करण्यात आले आहे. शाळा, कॉलेज, बाजारपेठ व इतर गर्दीच्या ठिकाणी गस्त करीत असतात. सोसायटयामध्ये सभा घेवून महिलांच्या अडचणीचे निवारण करण्यासाठी महिला हेल्पलाईन स्थापन केली आहे, प्रतिसाद ॲप सुरु केली आहे.

(३) अशा घटनांमध्ये गुन्हा दाखल करुन आरोपींना तात्काळ अटक करण्यात येते व मा. न्यायालयात हजर केले जाते. आरोपीविरुध्द जास्तीत जास्त पुरावा गोळा करुन कडक शासन होईल यादृष्टीने प्रयत्न केले जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नंदुरबार शहरात नगरपरिषदेच्या जागेत बेकायदेशीरपणे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविल्याबाबत

**(४३) २८९८८ (१३-०४-२०१७) श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार शहरात नगरपरिषदेच्या जागेत एका राजकीय संघटनेने कोणाचीही परवानगी न घेता बेकायदेशीरपणे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक पोलिसांनी ताब्यात घेतलेला पुतळा राजकीय संघटनेच्या दबावापोटी परत दिला व तो पुतळा पोलिसांच्या उपस्थितीत परत बसविण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक पोलिसांनी पुतळा परत देताना पुतळा बसविण्यासाठी आवश्यक असणा-या सर्व परवानग्यांची खात्री करुन पुतळा परत करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०५-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही. मालमत्ता जप्त करणे, सुरक्षित ठेवणे, परत करणे बाबतच्या तरतूदी फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ मध्ये नमुद आहेत. परंतू, सदर घटनेत कोणतीही मालमत्ता पोलीसांनी ताब्यात घेतली नाही तसेच परत सुध्दा केली नाही. पोलीसांनी पुर्णपणे नि:पक्षपणे कार्यवाही केलेली असून कोणत्याही व्यक्ती किंवा संघटनेच्या दबावाखाली कोणतीही कार्यवाही केलेली नाही. छत्रपती शिवाजी महाराजाचा नवीन पुतळा नगरपालिकेच्या व्यापारी संकुलात बसविण्यात आला असून त्या जागेवर नगरपालिकेचे संपुर्ण अधिपत्य आहे. बसविण्यात आलेल्या नवीन पुतळ्या संदर्भात नगरपालिकेकडून आजपावेतो कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. तरीसुद्धा कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी त्या ठिकाणी खबरदारीचा उपाय म्हणून २४ तास पुर्ववेळ पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे.

(४) दिनांक २२/०१/२०१७ रोजी व्यापारी संकुलात काही व्यक्तींनी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्याचा प्रयत्न केला असता पोलीसांनी त्यास अटकाव करण्याचा प्रयत्न केला. परंतू, जमावाने पोलीसांना धक्काबुक्की करुन सरकारी कामात अडथळा आणल्याबाबत नंदुरबार शहर पोलीस ठाणे येथे गु. र. क्र. २१/२०१७ भादंवि कलम ३५३, १४३, १८८ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी १४ व्यक्तींना अटक करण्यात आली असून सध्या सर्व अटक आरोपी जामिनावर मुक्त आहेत. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई महानगरपालिका प्रशासनाने शाळांमध्ये वैद्यकीय शिबिर आयोजित करण्याबाबत

**(४४) २९२३९ (१३-०४-२०१७) श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या १७ शाळांमध्ये निकृष्ट दर्जाच्या आणि अपु-या आहारामुळे विद्यार्थिनींमध्ये ॲनिमिया आणि अन्य आजार बळावत असून विद्यार्थिनींच्या आरोग्याची तपासणी करण्यासाठी शाळेत वैद्यकीय शिबिर आयोजित करण्याचा निर्णय महानगरपालिका प्रशासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिका प्रशासनाने वैद्यकीय शिबिर आयोजित करण्याच्या कालावधीचे नियोजन केले आहे काय,
(३) असल्यास, आरोग्य तपासणीत किती विद्यार्थीनी निरोगी आढळल्या आहेत, अन्य विद्यार्थ्यांवर काय उपचार करण्यात आले आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :** (१) व (२) सन २०१५-१६ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक, माध्यमिक व विशेष शाळांमध्ये इ. १ ली ते ५ वी, इ. ७ वी व इ. ९ वी च्या सर्व विद्यार्थ्यांची प्राथमिक तपासणी करण्यात आली.

तसेच, सन २०१६-१७ मध्ये इ. १ ली ते १० वी च्या सर्व विद्यार्थीनींची तपासणी करण्यात आली आहे.

प्राथमिक तपासणीअंती ज्या विद्यार्थ्यांमध्ये ॲनिमियाची लक्षणे आढळली, अशा विद्यार्थ्यांना निश्चित निदान व मोफत उपचाराकरिता महानगरपालिकेच्या दवाखाना / रुग्णालयात पाठविण्यात आले आहे.

तसेच, जून, २०१७ ते एप्रिल, २०१८ दरम्यान बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक, माध्यमिक व विशेष शाळांमध्ये सर्व विद्यार्थ्यांची प्राथमिक वैद्यकीय तपासणी शाळेत करण्यात येणार आहे.

(३) व (४) सन २०१५-१६ मध्ये तपासणी करण्यात आलेल्या ९७,७८९ विद्यार्थीनींपैकी १२,४९६ विद्यार्थीनी व सन २०१६-१७ मध्ये तपासणी करण्यात आलेल्या १,२०,४४६ विद्यार्थीनींपैकी १२,९६४ विद्यार्थीनी निरोगी आढळून आल्या आहेत.

महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये नॅशनल आयर्न प्लस इनिसिएटीव्ह (NIPI) कार्यक्रमांतर्गत सर्व विद्यार्थ्यांना ॲनिमिया होऊ नये याकरिता पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येणार आहेत:-

* प्रतिबंधात्मक उपचार म्हणून आठवडयातून एकदा लोहयुक्त गोळया देण्यात येणार आहे.
* ॲनिमिया असलेल्या विद्यार्थ्यांना उपचारासाठी ३ महिने लोहयुक्त गोळया देण्यात येणार आहेत.
* सर्व विद्यार्थ्यांना दर ६ महिन्यांनी जंतनाशक गोळया देण्यात येणार आहेत.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथे मोलकरणीवर अत्याचार केल्याबाबत**

**(४५) २९३७३ (१३-०४-२०१७) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील ओटी सेक्शन परिसरात राहणा-या मोलकरणीवर गेल्या नऊ महिन्यापासून बलात्कार केल्या प्रकरणी विठ्ठलवाडी पोलिसांनी सहा जणांवर गुन्हा दाखल केला असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या घृणास्पद प्रकाराला प्रोत्साहन देणा-या प्रकरणात दोन महिलांचाही आरोपीमध्ये सहभाग आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१७) :** (१) होय,

(२) होय,

(३) सदर प्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.I३६३/२०१६ भादंवि कलम ३७६, ३७६(ड), ३४२, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयातील आरोपी क्र.१ यास अटक करण्यात आले असून, दोन आरोपी महिलांना मा.न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे, तीन आरोपींना मा.सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन नामंजूर केल्याने त्यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे अर्ज केला आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) यांच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत**

**(४६) २९४३८ (१२-०४-२०१७) श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) मान्यता व संचालन नियम १९९९ ची सुधारित नियमावली २०१६ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय दिनांक ५ डिसेंबर, २०१६ मधील अ क्र १४.३ बहिस्थ विद्यार्थी बसण्यास परवानगी व अनधिकृत संस्थांना परवानगी देऊन शासन मान्यता प्राप्त ३ हजार संस्था व १० हजार कुटूंबावर अन्याय होत असल्याने सदरचा निर्णय तातडीने रद्द करुन

संगणक टंकलेखन अभ्यासक्रमाच्या संगणक अर्हता प्रस्तावास मान्यता देणे या दोन मागण्यांकरिता महाराष्ट्र राज्य टंकलेखन-लघुलेखन, संगणक टंकलेखन शासन मान्य संस्थांची संघटना, मुंबई यांनी दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.शालेय शिक्षण मंत्री, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, उपसचिव, शालेय शिक्षण विभाग आदिंकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनस्तरावर कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) दिनांक ५ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील बहिस्थ विद्यार्थी हा मुद्या वगळण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात आरक्षणाचा अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन करण्याबाबत

**(४७) २९५८० (१२-०४-२०१७) श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आरक्षणांसंदर्भात अभ्यास करण्यासाठी बिगर राजकीय समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१७) :** (१) खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खाजगी विनाअनुदानित औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतर्गत लेखा परिक्षणानंतर संचालनालय स्थापित लेखा परिक्षण मंडळाकडून लेखा परिक्षण होणेबाबत

**(४८) २९९८४ (१३-०४-२०१७) श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खाजगी विनाअनुदानित औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अंतर्गत लेखा परिक्षणानंतर संचालनालय स्थापित लेखा परिक्षण मंडळाकडून आपले लेखे तपासणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लेखा परिक्षण मंडळाच्या तपासणीनंतर शुल्क सुधारणा समितीसमोर शुल्क सुधारणेचे प्रस्ताव दाखल करणे बंधनकारक राहील, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लेखा परिक्षण मंडळ व शुल्क सुधारणा समिती गठीत करण्याचा अधिकार संचालकांना दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, लेखा परिक्षक, वित्त सल्लागार इत्यादी सदस्य आपल्या मर्जीतील नियुक्त करून संचालनालय स्तरावर गैरमार्गाचा अवलंब केला जाण्याची शक्यता आहे काय,

(५) असल्यास, अंतर्गत लेखा परिक्षणानंतर शुल्क वाढीचा प्रस्ताव सरळ शुल्क सुधार समितीसमोर सादर करण्याची रितसर व्यवस्था शासनाने स्वीकारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०६-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या शुल्क निश्चितीसाठी दिनांक १४/०५/२०१५ च्या शासन निर्णयान्वये कार्यपद्धती विषद करण्यात आली आहे. त्यामध्ये शुल्क सुधार समितीची रचना स्पष्ट करण्यात आली असून सदर समिती ही शासन निर्णयातील तरतूदीनुसार असल्याने संचालनालयातील मर्जीतील सदस्य नेमण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) दिनांक १४.०५.२०१५ च्या शासन निर्णयानुसार अंतर्गत लेखा परिक्षणानंतर शुल्क वाढीचा प्रस्ताव संचालनालय स्तरावर निश्चित करावयाचा आहे. तद्नंतर या शुल्क वाढीसंदर्भात विद्यार्थी तसेच पालक यांचेकडून तक्रारी प्राप्त झाल्या तरच शुल्क सुधार समिती स्थापन करावयाची आहे. त्यामुळे शुल्क वाढीचा प्रस्ताव सरळ शुल्क सुधारणा समितीसमोर सादर करण्याची व्यवस्था करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शाळांना संगणक पुरविणेबाबत**

**(४९) ३०४९९ (१२-०४-२०१७) श्री.ख्वाजा बेग, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ८० टक्के शाळांमध्ये संगणक नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार राज्यातील शाळांना संगणक पुरविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंजनखेड (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथे वैमनस्यातून वृध्द माजी सरपंचावर प्राणघातक हल्ला केल्याबाबत**

**(५०) ३०७२५ (१३-०४-२०१७) श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनखेड (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथे दिनांक २३ फेबुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास वैमनस्यातून वृध्द माजी सरपंचावर प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हल्लेखोरांनी यापूर्वी अनेक गुन्हे केले असून गावातील नागरिकांमध्ये दहशत निर्माण केली आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, अशा या गंभीर गुन्हे करणा-या गुन्हेगारास त्वरित पकडून त्यांच्यावर कारवाई करणेबाबत तसेच भविष्यात अशा स्वरुपाचे गुन्हे घडू नयेत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०५-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन आर्णी येथे गु. र. क्र. ७३/१७ भादंवि कलम ३०७, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील दोन्ही आरोपी घटना घडल्यापासून फरार आहेत. त्यांचा शोध सुरु आहे. भविष्यात अशा स्वरुपाच्या घटना घडू नयेत यासाठी प्रतिबंधक कारवाई करण्यात येत आहे. तसेच गावात प्रतिष्ठीत व्यक्ती व तंटामुक्ती समितीची शांतता सभा घेऊन शांतता राखण्याबाबत आवाहन करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.